# जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग

## जाहीर सूचना

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांचे आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग व त्यांचे अधिपत्याखालील सर्व न्यायालयांकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामधील आयकर विवरणपत्र भरण्यासाठी, आयकर सल्लागार म्हणून नियुक्ती करावयाची आहे. सदरकामी इच्छुक असणाऱ्या आयकर सल्लागार यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील मोहरबंद निविदा/दरपत्रक मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांच्या नावाने सिलबंद लखोटयामध्ये दि. २७/०५/२०२४ पूर्वी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत मा. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे, दरपत्रकाच्या पाकीटावर वरच्या भागात "आयकर सल्लागार नियुक्तीकामी दरपत्रक" असे लिहून सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त निविदांचा/दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार कोणतेही कारण न सांगता, मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

जा.क्र./वित्त/ ३१०८ /२०२४<br>
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग<br>
दि. १३/०५/२०२४

प्रभारी प्रबंधक,<br>
जिल्हा न्यायालय,रायगड अलिबाग.

प्रत:- १) मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे नोटीसबोर्डवर प्रसिध्द करणेसाठी
२) मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी संगणक शाखा, जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडे.